**प्रकल्प प्रवर्तक, कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ९ तालुका- मंगळवेढा, जल संपदा विभाग, जिल्हा -सोलापूर यांनी प्रस्तावित केलेल्या मंगळवेढा उपसा सिंचन प्रकल्प, तालुका मंगळवेढा, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र या उपसा सिंचन प्रकल्पा बाबतच्या जाहीर लोकसुनावणीचे इतिवृतांत.**

---

प्रकल्प प्रवर्तक, कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ९ तालुका - मंगळवेढा, जल संपदा विभाग, जिल्हा सोलापूर यांनी प्रस्तावित केलेल्या मंगळवेढा उपसा सिंचन प्रकल्प मंगळवेढा या उपसा सिंचन प्रकल्पाबाबतची जाहीर लोकसुनावणी गुरुवार दिनांक २७ मार्च २०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता कामसिध्द मंदिर देवस्थान सभागृह, हिवरगाव, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर, महाराष्ट्र, येथे घेण्यात आली.

श्री. निखिल मोरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सोलापूर तथा आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मा. मनिषा कुंभार निवासी उपजिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हा दंडाधिकारी सोलापूर तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. जगन्नाथ शं. साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तसेच प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी प्रक्रिया सुरु करण्यात आली.

आयोजक पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय नवी दिल्ली यांच्या दिनांक 14 सप्टेंबर, 2006 व सुधारित दिनांक 01 डिसेंबर, 2009 च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी

आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ९ तालुका मंगळवेढा, जलसंपदा विभाग, जिल्हा सोलापूर यांनी प्रस्तावित केलेल्या मंगळवेढा उपसा सिंचन प्रकल्प मंगळवेढा या उपसा सिंचन प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई यांच्याकडून अधिसूचना प्राप्त झाली.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित अधिसूचनेनुसार संवर्ग १ (सी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास मंत्रालय पर्यावरण, वने व हवामान बदल, भारत सरकार नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

सहसंचालक (जप्रनि) म.प्र.नि. मंडळ, मुंबई यांच्या दि. 30/01/225 रोजीच्या पत्रान्वये उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सोलापूर यांना सदरील प्रकल्पाविषयी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेण्याबाबत आदेशित करण्यात आले. मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सदरची जनसुनावणी गुरुवार दिनांक २७ मार्च २०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता घेणे बाबत मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना 2006 व सुधारित अधिसुचना 2009 अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई . १७/२०२४, व्दारा पत्र

क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२५०३०३-एफटीएस-०१८४ दिनांक ०३/०३/२०२५ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली.

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | अध्यक्ष |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे<br>जिल्हा - पुणे, | - | सदस्य |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>सोलापूर | - | आयोजक |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या 30 दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र "दैनिक संचार "मध्ये मराठी व दैनिक दिव्य मराठी " मध्ये इंग्रजी भाषेमध्ये जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दिनांक २५/०२/२०२५ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहिती व अभ्यासाकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर,
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर
३. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर
४. प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ३रा मजला, जोग सेंटर, जुना मुंबई-पुणे हायवे, वाकडेवाडी, पुणे - ४११ ००३
५. मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२
६. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
७. उप प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ब/४, बाळी बिल्डिंग, सिव्हिल लाईन्स, शासकीय दूध डेअरीसमोर, सात रस्ता, सोलापूर - ४१३ ००३,
८. तहसीलदार, तहसील कार्यालय- मंगळवेढा, तालुका- मंगळवेढा,, जिल्हा- सोलापूर,
९. गट विकास अधिकारी, पंचायत समिती- मंगळवेढा, तालुका- मंगळवेढा, जिल्हा- सोलापूर,
१०. ग्रामपंचायत कार्यालय मौजे – लक्ष्मीदहिवडी, आंधळगाव, शेलेवाडी, खुपसंगी, लेंडवे-चिंचाळे, गोणेवाडी, नंदेश्वर रड्डे, सिध्दनकेरी, खडकी, जालिहाल, निंबोणी, भालवणी, जित्ती, हाजापूर, मेटकरवाडी, डोंगरगाव, हिवरगाव, खवे, तळसंगी, येड्राव, जुनोनी, पाटखळ, भोसे या गावांशी संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर.
११. संकेतस्थळ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की, आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना / आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची

व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई यांचेमार्फत केंद्र शासनास सादर करण्यात येईल.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सुरु करण्याची विनंती केली.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण करताना सांगितले की, महाराष्ट्र सरकारने प्रस्तावित मंगळवेढा लिफ्ट सिंचन योजना (LIS) साठी ६९७.७१ कोटी रुपयांच्या अर्थसहाय्याला प्रशासकीय मान्यता दिली आहे. जी G.R. क्र.: २०१९/(१०१/२०१९)/भाग-१/जसंअ दिनांक १४ मार्च २०२४ रोजी जारी करण्यात आली. प्रस्तावित मंगळवेढा लिफ्ट सिंचन योजना (L.I.S.) मध्ये मंगळवेढा तालुक्यातील १७१८७ हेक्टर जमिनीचे सिंचन करण्याचे उद्दिष्ट आहे, जे दुष्काळप्रवण क्षेत्र आहे. प्रस्तावित L.I.S. अंतर्गत एकूण सकल कमांड क्षेत्र (G.C.A.), लागवडीयोग्य कमांड क्षेत्र (C.C.A.), आणि सिंचनयोग्य कमांड क्षेत्र (I.C.A.) अनुक्रमे २२५०७.९१६ हेक्टर, २१७२५.४८२ हेक्टर आणि १७१८७.२७५२ हेक्टर आहेत. प्रकल्पानंतर १००% पीक पद्धती साध्य करून २४ गावांना फायदा होईल. ज्यामध्ये ७५% खरीप हंगामात आणि २५% रब्बी हंगामात असेल. पाणी पुरवठा गंजेगाव पीएच-१ कडून २.०४ टीएमसी पाणी वर्षभर उचलून पूर्ण केला जाईल, जे उजनी राईट बँक कॅनाल (URBC) च्या च. ९४/३०० वर ९५ किमीवरून घेतले जाईल. सादरीकरणा नंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी कांही आक्षेप, सुचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे:-**

| अ.क्र | उपस्थित व्यक्तीचे नाव, गाव व त्यांनी केलेल्या टीका टिप्पणी, आक्षेप, सूचना, मुद्दा इत्यादी | विभागाचे प्रतिनिधी/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन/ उत्तर |
|---|---|---|
| 1 | श्री. प्रदीप खेडकर रा. हिवरगाव , ता. मंगळवेढा, जि. सोलापूर यांनी आपले मत मांडले, या जनसुनावणी च्या माद्यमातून आपल्याला सूचना आहे की हा प्रकल्प कार्यान्वित करत असताना पर्यावरणाचे कमीत कमी नुकसान व्हावे व जि वृक्षतोड होणार आहे ती कमीत कमी व्हावी तसेच त्या अनुषंगाने वृक्ष लागवड व्हावी असे सूचित केले | यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की,सदर प्रकल्प पूर्ण होण्यासाठी रायझिंग मेन व पंप हाउस चे काम प्रस्तावित आहे त्यासाठी कुठल्याही प्रकारची वृक्षतोड केली जाणार नाही म्हणजे झाडे तोडली जाणार नाहीत तसेच पंप हाउस च्या ठिकाणी व रस्त्याच्या दोन्ही बाजूस स्थानीक जातीची झाडे जसेकी कडुलिंब, वड, पिंपळ यासारखी झाडे लावण्यात येणार आहेत. जेणेकरून स्थानिक पर्यावरण संवर्धनासाठी मदत होईल. |
| 2. | श्री. ओमकार माळी, रा. हिवरगाव , ता. मंगळवेढा, जि. सोलापूर यांनी प्रश्न विचारला की सदरील प्रकल्प कार्यान्वित होण्यासाठी किती कालावधी लागेल | यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की, सदरील प्रकल्पासाठी पर्यावरण मान्यता घेणे आवश्यक आहे, पर्यावरण मान्यता मिळण्याची प्रक्रिया सुरु आहे प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास |

| | | |
|---|---|---|
| | | पाच वर्षाचा कालावधी आवश्यक आहे. |
| **3.** | श्री. उमेश खांडेकर रा. हिवरगाव , ता. मंगळवेढा, जि. सोलापूर यांनी प्रश्न विचारला की सदरील प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर गावांना वर्षातून किती कालावधी साठी पाणी उपलब्ध राहणार आहे | यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की, सदरील प्रकल्प हा आठमाही प्रकल्प आहे, खरीप हंगाम व रब्बी हंगामासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. उजनी प्रकल्पाद्वारे वर्षातून सहा वेळा प्रकल्पातील गावांना पाणी उपलब्ध होणार आहे. ज्याद्वारे शेती उत्पादन वाढण्यास मदत होईल |
| **4.** | श्री. संजय बरांगे रा. हिवरगाव , ता. मंगळवेढा, जि. सोलापूर यांनी प्रश्न विचारला की सदरील प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर किती गावांना पाणी उपलब्ध होणार आहे | यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की, २४ गावांना प्रस्तावित प्रकल्पाचा लाभ मिळणार आहे. |

त्यानंतर मा. श्री. निखिल मोरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी पुन:श्च एकदा आपली मते मांडायचे उपस्थितांना आवाहन केले.

त्या नंतर श्री. जगन्नाथ साळुंके यांनी आपले मत मांडले की चर्चा करत असताना असे निदर्शनात आले की प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी ९००० किलो व्हॅट इतक्या विजेची आवश्यकता आहे ज्याला आपण अपारंपरिक उर्जा स्त्रोतांद्वारे पुरवठा करण्याबाबाद सूचित केले, या संदर्भात, सौर उर्जेसाठी तरतुदी केल्या जाव्या त्यावर

श्री ना. वा.जोशी कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ९, मंगळवेढा यांनी उत्तर दिले की आपल्या महाराष्ट्रात बऱ्याच सिंचन योजना सुरु झाल्या व त्या कार्यान्वित आहे त्यांचे एकंदरीत विजेचा वापर (प्दएर चेन्तुम्पतोन्टि बघितला तर कधी-कधी आपल्याला महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (श्श्भ) द्वारे मिळणारा पुरवठा कमी पडतो त्यामुळे बहुतेक योजनांना अडचणी येतात, त्या अनुषंगाने शासनाने शासन आदेश (ह) काढला आहे ज्या द्वारे उपसा सिंचन योजना ह्या सौरउर्जेवर चालवण्याबाबत सूचित केले आहे या अनुषंगाने विभागामार्फत स्थळ पाहणी करण्यात आली आहे व सौरउर्जे संदर्भात कामकाज सुरु करण्यात आले आहे व येत्या चार-पाच वर्षात बाऱ्याच योजना सौरउर्जेद्वारे कार्यान्वित करण्यात येतील.

त्या नंतर श्री. जगन्नाथ साळुंके यांनी मत मांडले की कार्यस्थळावर काम सुरु असताना निर्माण होणारे डेब्रिज व्यवस्थापन (C & D Waste Management) हे शासनाच्या मार्गदर्शक सूचना नुसार करावे तसेच स्थानिक स्थरावर काम करत असताना स्थानिकांना प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या यावर सल्लागार यांनी आश्वासन दिले की जास्तीत जास्त पुनर्वापर पंपहाऊस, रस्ता विकास आणि खड्ड्यांची पुन्हा भराई करण्यासाठी केला जाईल, तसेच निर्माण होणारे अधिकचे डेब्रिज शासनाच्या मार्गदर्शक सूचना नुसार सखल भागात भारती करण्यात येयील.

त्यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा. मनिषा कुंभार , निवासी उपजिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हा दंडाधिकारी , सोलापूर यांनी व्यावसायिक पर्यावरणीय जबाबदारी (कॉर्पोरेट ईन्व्हायरोमेंटल रिस्पाँसिबिलीटी (CER)) याबद्दल माहिती देण्याच्या सूचना केल्या त्यावर प्रकल्प सल्लागार यांनी माहिती दिली की, पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार द्वारे प्रकाशित तारीख १ मे २०१८ रोजीचे परिपत्रका नुसार आपल्या प्रकल्पाच्या अपेक्षित खर्चाच्या १ टक्के निधी हा व्यावसायिक पर्यावरणीय जबाबदारी (कॉर्पोरेट ईन्व्हायरोमेंटल रिस्पाँसिबिलीटी) म्हणजेच CER साठी १% ची तरतूद करण्यात आली आहे. ज्या संदर्भात सीईआरसाठी (CER) निधी

वापराचा प्रस्ताव पाटबंधारे विभाग तयार करेल आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार निधीचे वितरित केले जाईल.

व्यक्त करण्यास पुरेशी संधी दिली असून, हि जाहिर सुनावणी पूर्ण करावयास हरकत नाही असेही मत अध्यक्षा मा. मनिषा कुंभार , निवासी उपजिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हा दंडाधिकारी , सोलापूर यांनी व्यक्त केले.

या नंतर पर्यावरण सार्वजनिक सुनावणी समितीचे संयोजक यांनी मंगळवेढा लिफ्ट सिंचन योजनेच्या पर्यावरण सार्वजनिक सुनावणीमध्ये रहिवाशांच्या सक्रिय सहभागाची दखल घेऊन आणि मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| **( श्री. निखिल मोरे )**<br>समन्वयक,<br>पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर | **(श्री. जगन्नाथ साळुंखे)**<br>सदस्य,<br>पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती आणि<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे | **( मनिषा कुंभार )**<br>अध्यक्षा,<br>पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा<br>अपर जिल्हा दंडाधिकारी,<br>सोलापूर |